ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.VI/Dec 2011pp.1-4

Research Paper

" वाढत्या महागाईमुळे समाजावर झालेला परिणाम "

Prof. Iliyas .G. Bepari
Athawale college of social work
Bhandara

प्रस्तावना

जगण्यासाठी आवश्यक असणा–या गरजांची जागा बाजार प्रधान गरंजांनी घेतली. बाजारात घडणा–या ब–याचशा घडामोडीचा अन्वयार्थ लावणे कठीण जात असल्याने ॲडम स्मिथ या अर्थशास्त्राने बाजारात सक्रिय असलेल्या अदृश्य हाताचा उल्लेख केलेला आहे. भारतातील बाजार व्यवस्थेत विशेषतः शेत मालाच्या बाजारात सक्रिय राहुन महागाई सारखे भस्मासुर उभे करणारा दृश्य हात धडधडीत दिसत असुन सुध्दा या हाताचा तसा गांभीर्याने विचार झालेला नाहि. या प्रश्नाचे विक्राळ स्वरुप धारण केले आहे. सर्व काही विकत घेण्याची पाळी आली. जगणं दिवसे दिवस महाग होत आहे. पण विकत घेण्या साठी गरीबा कडे काय?विकलं जावु शकेल असं स्वतः तरी त्याच्याकडे काय आहे? मुक्या मनानं गरीब घरा बाहेर पडतात.

देशाच्या अतिशय शिखरा वर पोहचलेल्या महागाई वर सारेच चितांग्रस्त आहे. परतु सर्वात जास्त मध्यमवर्गीय गोरगरीब माणुस ,गृहीणी ,हातमंजुर, शेतकरी, कष्टकरी, बेरोजगार आणि इतर सामान्य माणसाचे कबंरडे मोडले आहेत. उपलब्ध मजुरीच्या मानाने महागाई इतकी झपाटयाने वाढली की सर्वच अंतभित अंचबित आश्चर्य चकित झाले आणि जनतेचे जीवन जगणे कठीण झाले. दैनदिन गरजा पुर्ण करता करता चिंताग्रस्त देंशातील जनता व आजची पिढी कुठे जाणार याचा विचार करायला कुणालाच वेळ नाही. सारेच हतबळ असल्याचे चित्र आहे महागाई बाबत सारेच मौन बाळगुण आहेत. मात्र इतर विषया कडे लक्ष जास्त महागाई कमी होणे त्याचे कठीणच गरीबाची मीठ भाकरी, चटणी पळाली आता वरण भात साथ जेवणही महागाईने दुर्लभ होणार अशी भिती आहे. देंशातील सर्वच स्तरावरील जनता इतकी श्रीमंत झाली की काय त्याला पुरक दरवाढ करणे आवश्यक झाले असे विचांरवंताना आणि जनतेला वाटायला लागले. महागाई म्हणजे मागणी पेक्षा पुरवठा कमी असे म्हणता येईल.

महागाई ही वर्तमान काळातील महत्वाची जागतीक आर्थिक घटना होय. जगातील सर्वच देशा वर महागाईचा परिणाम झाला आहे. अर्थशास्त्राज्ञ, नियोजन कर्त आणि धोरण कर्त्याचे लक्ष आकर्षित केले आहे.महागाई या संज्ञेची सर्वाना मान्य अशी व्याख्या दिलेल्या आहेत. सोप्या शब्दात सांगायचे तर महागाईचा संबंध वस्तु व सेवा याच्या वेगाने वाढणा–या किमंतीशी असुन त्यामुळे पैशाच्या मुल्यात किमंतीच्या वाढीच्या कारण प्रमाणात घट होते.

सध्या देशात महागाईचा प्रश्न बिकट झालेला आहे. महागाईचा उंचाक आकाशाला भिडलेला आहे.

महागाईने 16 वर्षातील महागाईचा उंच्चाक वाढलेला आहे. 4 ऑगस्ट रोजी संपलेल्या आठवडयात महागाईचा दर 12.44 टक्के झाला आहे. शासनाने महागाई वर अंकुश लावण्या साठी प्रयत्न केल्या वर सुध्दा जिवनावश्यक वस्तु जसे फळभाज्य, कडधान्ये, धान्ये, मसाले व इधनाचे डिझेल व पेट्रोल आणि विमानाचे इंधन सुध्दा महागले आहे. या वाढत्या महागाईचा सर्वसामान्य जनतेवर आर्थिक पिवळणुक झालेली आहे. व त्या सोबतच त्यांचा आर्थिक दर्जा सुध्दा खाजावलेला दिसुन येत आहे.

आकाशाला भिडत चाललेला महागाईचा आलेख हा बेस इफेक्ट अथवा विदेशी इफेक्ट आहे असे सरकार तर्फ सांगण्यात येत असेल तरी जानेवारी 2008 पासुन तर आता पर्यत एका सामान्य कुटुंबाचे बजेट मात्र 30 ते 40 टक्याने वाढले आहे. हे खरे आहे.

ठोकमुल्या मध्ये झालेल्या वृध्दी वर आधारित महागाईचा आकडा 12.73 टक्क्या वर पोहोचल्यानंतर हे सर्व केवळ बेसइफेक्ट मुळे म्हणजे मागील वर्षी याच काळात चलण फुगविण्यात झालेली घट यामुळे घडले असल्याचे सरकार सांगत आहे. महागाईची झळ सर्वानाच पोहचते. पण तिचा सर्वाधिक फटका बसतो. तो गरीब लोकांना गरीब लोंकाकडे पुरेशा पैसा नसतो. त्यामुळे त्याची खरेदी करण्या साठी क्षमता खुपच कमी असते. अशा परिस्थितीत भाववाढ सारखी होत राहिल तर जीवनावश्यक वस्तु ही खरेदी करणे त्यांना जमत नाही म्हणुनच भाववाढीला आळा घालण्याची गरज असते.

भारतातील भाववाढीची प्रवृत्ती

मार्च 1969 मध्ये ठोक किमत निर्दशांक 185. 8 होता तो मार्च 1989 मध्ये 256.2 पर्यत वाढला आणि मार्च 1982 त्यात पुन्हा 289.3 पर्यत वाढ झाली. अशा रितीने तीन वर्षाच्या काळातील भाव वाढीचा वार्षीक दर 14. 8 टक्के इतके होता. भाववाढीचे स्पष्टीकरण करण्या साठी 1989–.82 हे आधार वर्ष मानले जात होते. आता 1993 –94 हे आधार वर्ष मानले जाते. 1990–91 मध्ये ठोक किमंतीत 12.1 टक्के वाढ झाली होती 1991–92 मध्ये भाववाढीच्या दराने 13. 7 टक्कया पर्यत उच्चांक वाढला होता. 1992 – 93 0 1993 – 94 या वर्षातील किमंतीच्या पातळी वर सातत्याने झालेली वार्षिक सरासरी वाढ 8.9 टक्के होती. ती 1995 –96 मध्ये भाववाढीचा दर 5 टक्क्याने पर्यत कमी झाला होता. हा काही विवेकी आर्थिक धोरणाचा परिणाम नव्हता तर 1993 मध्ये लोक सभेच्या निवडणुका होणार असल्या मुळे सरकारने प्रशासित किंमतीत बदल पुढे ढकलला होता राजकोषीय तुट कमी करण्यासाठी विकासात्मक खर्चात घट करण्यात आली. यामुळे साहजिकच भाववाढीला ही योग्य धोरणे नव्हती.

मे 1998 मध्ये भाववाढीचा दर 6.4 टक्के होता सप्टेबर 1998 च्या शेवटी भाव वाढीचा वार्षिक दर 8.8 टक्के होता. 16 जानेवारी 1999 रोजी हा दर 8.2 टक्के होता.

2000 – 01 या वर्षातील 52 आठवडयातील साप्ताहीक भाववाढीचा सरासरी दर 7.1 टक्कें इतपत उंचावला होता. 2001 –02 या वर्षातील पहिल्या सहा महिन्यात एप्रिल ते सप्टेबर भाववाढीचा दर 5 टक्या पर्यत घटला होता. हा दर सप्टेबर 2001 नंतर आणखी घटण्यास सुरुवात झाली. आणि तो जानेवारी 2002 पर्यत 1.3 टक्या पर्यत घटला 2001 –02 या वित्तिय वर्षात भाववाढीचा सरासरी दर 1.6 टक्के या किमान पातळी वर होता.

2002 – 03 या वर्षी देशातील 17 राज्यात अवर्षणग्रस्त परिस्थिती होती. त्यामुळे पुन्हा भाववाढीचा दर वाढु लागला. मे 2002 मध्ये भाव वाढीचा दर 2 टक्के होता. तो 5 एप्रिल 2003 रोजी 6.2 टक्के इतका

वाढला 28 ऑगस्ट 2004 रोजी भाववाढीच्या दराने 8.7 टक्के दराचे अत्युच्च शिखर गाठले त्यानंतर 23 एप्रिल 2005 रोजी भाव वाढीच्या दरात 6.9 टक्यापर्यंत घट झाली 17 सप्टेबर 2005 रोजी ठोक किमतीचा निर्दशांक 1935 होता. त्या दिवसा पर्यंत अलीकडील 12 महिन्याचा सरासरी भाववाढ दर 5.2 टक्के होता.

महागाईची कारणे

वस्तु आणि सेवाच्या मागणीत वाढ	वस्तु आणि सेवाच्या पुरवठयातील घट
१ सार्वजनिक खर्चात वाढ	१ औद्योगिक कलह
२ खाजगी खर्चात वाढ	२ उत्पादक घटकाची टंचाई
३ उपभोक्त्याच्या खर्चात वाढ	३ नैसर्गिक आपत्ती
४ भुतकालीन अंतर्गत कर्जाची परतफेड	४ वस्तुची साठेबाजी
५ लोकसंख्येत वाढ	
६ निर्यातीत वाढ	
७ चुकीचे अर्थप्रबंध	

वाढत्या महागाईचे परिणाम

भाववाढीचे उत्पादना वरील परिणाम	वितरणा वरील परिणाम	आर्थिकतेवर परिणाम
चलन मुल्यात घट	ऋणको आणि धनको	सामाजिक
विदेशी गुंतवणुकीत घट	वेतन आणि मजुरी मिळविणारा	राजकिय
देशी गुंतवणुकीत घट	स्थिर उत्पन्न गट	

३

व्यावसायिक अनिश्चितता	संघटन
उत्पादक साधनाचे परिवर्तन	गुंतवणुकदार
वस्तुच्या गुणात्मकतेचा –हास	शेतकरी
जीवनावश्यक वस्तुची साठेबाजी	
विश्वास नष्ठ होते	

वाढत्या महागाईस भारतातील अल्प दरडोई उत्पन्न सुध्दा परिणाम करणारा महत्व पुर्ण घटक आहे.

भारतीय लोकाचे डरडोई सरकारी उत्पन्न 2003 मध्ये 530 डॉलर इतके होते. मोजक्याच विकसनशील देशाचा अपवाद वगळता भारतीय लोकाचे दरडोई उत्पन्न जग भराच्या तुलनेत बरेच कमी आहे इ.स 2003 मध्ये स्विल्झरलॅंड मधील लोकाचे दरडोई उत्पन्न भारतातील लोकाचे 75 पट यावरुन भारत आणि विकसित देशातील लोकाच्या दरडोई उत्पन्नातील प्रंचंड तफावत दिसुन येते.

मागणीत वाढ –किमंतीत वाढ – लाभसीमेत वाढ – उत्पादनात वाढ – रोजगारीत वाढ – क्रयशक्तीत वाढ – मागणीत वाढ – किंमतीत वाढ असा घटना क्रम दिसुन येतो.

वाढत्या महागाई मुळे समाजावर झालेला परिणामाचे उद्देश खालील प्रमाणे

1. वाढत्या महागाई मुळे समाजावर झालेला परिणामाचे कौटुंबिक माहिती मिळवणे
2. वाढत्या महागाई मुळे समाजावर झालेला परिणामाचे आर्थिक माहिती मिळवणे
3. वाढत्या महागाई मुळे समाजावर झालेला परिणामाचे सामाजिक माहिती मिळवणे
4. वाढत्या महागाई मुळे समाजावर झालेला परिणामाचे आरोग्यात्मक माहिती मिळवणे

वाढत्या महागाई मुळे समाजा वर झालेला परिणामाचे उपकल्पना खालील प्रमाणे

1. वाढत्या महागाई मुळे समाजात मध्ये कौटुंबिक कलह निर्माण होतो.
2. वाढत्या महागाई मुळे समाजातील लोकाची आर्थिक परिस्थिती ढासळते
3. वाढत्या महागाई मुळे समाजातील लोकाची सामाजिक दर्जा नाहिसा होतो
4. वाढत्या महागाई मुळे समाजातील लोकाच्या आरोग्यावर परिणाम होतो

वरील माहितीचा अभ्यास वर्णनात्मक स्वरुपाचा असुन सोईस्कर नमुना निवड पध्दतीचा

वापर करण्यात आलेला आहे.

यासाठी अनेक तथ्याचा वापर करण्यात आले आहे.

वाढत्या महागाई मुळे समाजातील लोकाच्या परिस्थितीचा अभ्यास करित असताना

क्षेत्राची निवड करण्यात आली या मध्ये अनेक भागाचा विचार करण्यात आलेला आहे

कारण की या वाढत्या महागाई मुळे सामाजातील प्रत्येक स्तरा वरील सामाजातील

प्रत्येक व्यक्तिचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

4 वाढत्या महागाई मुळे समाजा वर झालेला परिणामाचा अभ्यास करीत असताना समाजातील सर्व स्तरा वरील परिस्थितीचा अभ्यास करीत असताना नमुना निवड म्हणुन सोयीस्कर नमुना पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. कारण की वाढती महागाई ही सर्व स्तरातील समाजा वर परिणाम करीत आहे.

वाढती महागाई ही समाजातील सर्व स्तरातील लोकाच्या अभ्यास करण्यात आलेला असुन त्या साठी वर्णनात्मक सशांधन आराखडाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

वाढत्या महागाईमुळे समाजावर झालेला परिणामाचा अभ्यास करीत असताना तथ्थ संकलना साठी प्राथमिक पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे यामध्ये निरिक्षण मुलाखत अनुसुची चा वापर करण्यात आलेला आहे तसेच दुय्यम पध्दती मध्ये काही पुस्तके, वर्तमान पत्रे, मासिकाचा वापर करण्यात आलेला आहे

निष्कर्ष

1. वाढत्या महागाईमुळे समाजात आर्थिक परिस्थितीची टंचाई निर्माण होते.
2. वाढत्या महागाई मुळे समाजात सामाजिक नियंत्रण राहत नाही.
3. वाढत्या महागाई मुळे सामाजिक दर्जा / स्तर कमी होतो.
4 वाढत्या महागाई मुळे सामाजिल लोकामध्ये कुटुबात कलह, ताण, तणाव,संघर्ष निर्माण होतो
5. वाढत्या महागाई मुळे समाजा मध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती निर्माण होते
6. वाढत्या महागाई मुळे समाजातील मुलाचे पालनपोषण, शिक्षण, आरोग्य इ. चांगल्या प्रकारे सेवा देवु शकत नाही.

संदर्भ ग्रथी सुची

प्रा.प्रदीप आगलावे आधुनिक भारतातील सामाजिक समस्या
विद्या प्रकाशन प्रथम आवृत्ती 1907
प्रा. के.एच.ठक्कर भारतीय अर्थशास्त्र
प्रा. जी. व्ही. कुभोजकर फडके प्रकाशन पहिली आवृत्ती 1997
डॉ. श्री. आ. देशपांडे भारतीय नियोजन आणि आर्थिक विकास
पिंपळापुरे प्रकाशन तिसरे आवृत्ती 1982
व्ही. पी. मित्तल महान देशोका आर्थिक विकास
राजीव प्रकाशन प्रथम आवृत्ती 1992 – 93
प्रा. सौ रेहपांडे समाज कार्यात आरोग्य काळजी व व्यवस्था
यश प्रकाशन प्रथम आवृत्ती 2006
प्रा. जी. एन. झामरे आधुनिक अर्थशास्त्र
यश प्रकाशन चौथी आवृत्ती
संपादक राजेद्र दर्डा लोकमत वर्तमान पत्र